0 3 NOV 2022
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य विद्यापीठात अत्याधुनिक उपकरणे असावीत

## बंगळूर असेंद्रीय आणि भौतिक रसायनशास्त्रचे अध्यक्ष प्रा. एलांगनन अरूणन यांची अपेक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र (**SAIF**) ची पाहणी केल्यानंतर समाधान व्यक्त केले. तसेच देशातील प्रत्येक राज्य विद्यापीठात अत्याधुनिक उपकरणे असावीत, अशी अपेक्षा बंगळूरच्या असेंद्रिय आणि भौतिक रसायनशास्त्र विभागाचे अध्यक्ष प्रा. एलांगनन अरुणन यांनी व्यक्त केली.



कोल्हापूर :शिवाजी विद्यापीठातील स्तुती उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बंगळूरच्या असेंद्रिय आणि भौतिक रसायनशास्त्र विभागाचे अध्यक्ष प्रा. एलांगनन अरुणन, स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे, प्र कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील, जयपूर राजस्थान विद्यापीठाचे प्रा. अरुण सावंत.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित, शिवाजी विद्यापीठातील सैफ सेंटरच्या वतीने आयोजित स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. तर जयपूरमधील राजस्थान विद्यापीठाचे व मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्रा. अरुण सावंत यांची प्रमुख्य उपस्थिती होती. स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. मंगळवारी सायंकाळी तज्ज्ञ मार्गदर्शक व सहभागीसाठी सांस्कृतिक कार्यक्रम हॉटेल पर्ल येथे झाला.

डॉ. सोनकवडे यांच्या स्तुती कार्यक्रमाची काश्मीरपासून सुरूवात झाली असून व्ही. आय. टी. वेल्लोर, आय. आय. टी. जोधपूर, बाबासाहेब भीमराव आंबेडकर केंद्रीय विद्यापीठ लखनऊ, गोवा विद्यापीठ, आणि केरळ नंतर प्रथमच केंद्रशासित प्रदेशात म्हणजे पाँडिचेरी असा भारतभर पोहचला आहे, असे सांगत शिवाजी विद्यापीठाचा स्वतःचा परिचय करून दिला. विद्यापीठात ७ नोव्हेंबरपर्यंत हा कार्यक्रम सुरू राहणार असून श्रीनगर, दिल्ली, बंगलोर, गोवा, मुंबई, पुणे आदी देशातील विविध भागातून १४ तज्ज्ञांची व्याख्याने होणार आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवच्या अंतर्गत अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम देशभर राबविले जात आहेत, असे डॉ. सोनकवडे यांनी सांगितले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन केले आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, संशोधन आणि विद्यार्थ्यांचे करिअर घडवण्यात शिक्षकांची भूमिका अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देवून एक वेगळा आदर्श घडवला पाहिजे, असा सल्ला दिला. तसेच भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याबद्दल माहिती दिली. डॉ. अरूणन आणि डॉ. सावंत यांनी दोन्ही सत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्तुति प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. के. डी. पवार, डॉ. डी. एस. भांगे यांच्यासह अन्य प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 3 NOV 2022
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अत्याधुनिक उपकरणांची सुविधा प्रत्येक राज्य विद्यापीठामध्ये हवी

## अरुणन : विद्यापीठात 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रम सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण सुविधा केंद्र पाहून समाधान वाटले. प्रत्येक राज्य विद्यापीठात संशोधनासाठी अशी सुविधा हवी, असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या असेंद्रिय आणि भौतिक रसायनशास्त्र विभागाचे अध्यक्ष प्रा. एलांगनन अरुणन यांनी मंगळवारी येथे केले.

विद्यापीठात केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे प्रायोजित स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, तर मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्रा. अरुण सावंत प्रमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या संशोधन आणि करिअरमध्ये शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. उपकरणे संशोधन करीत नाहीत. मात्र, आपण सर्वांनी ही उपकरणांची सुविधा वापरली पाहिजे, असे प्रा. सावंत यांनी सांगितले.

स्तुतीचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी डॉ. के. डी. पवार, डी. एस. भांगे उपस्थित होते. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्तुती प्रकल्पाचे वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. एलांगनन अरुणन यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून आर. जी. सोनकवडे, पी. एस. पाटील, अरुण सावंत उपस्थित होते.

### देशभरातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन...

या स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक वाढत आहे. काश्मीर, वेल्लोर, जोधपूर, लखनौ, गोवा, केरळ, पाँडिचेरी येथे कार्यक्रम झालेत. शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात सात दिवसांत देशभरातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार असल्याची माहिती डॉ. सोनकवडे यांनी दिली.

पुढारी

# ‘वैज्ञानिक दृष्टिकोनातून कंपन्यांची समाजसेवा’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वैज्ञानिक दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून देशामधील मोठमोठ्या कंपन्या विविध माध्यमांतून आपल्या पद्धतीने समाजाची सेवा करीत असल्याचे प्रा. सोनकवडे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठात ‘स्तुति’ अंतर्गत चालू असलेल्या आठवडा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सहभागी झालेल्या सर्व शिक्षक संशोधक विद्यार्थ्यांना प्रथम सत्रात टी ए इन्स्ट्रूमेंटस्‌चे रूपेश खेडकर यांनी ‘थर्मल ॲनालिसिस’ या विषयावर मार्गदर्शन केले. यात विविध उपकरणांचा वेगवेगळ्या क्षेत्रांत कसा उपयोग होऊ शकतो याबाबतची सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या सत्रात तोष्विन कंपनीचे अमोल जाधव यांनी जीसी-एमएस-एमएस या उपकरणावर नमुने तपासणी विषयी तपशीलवार माहिती दिली. यावेळी श्रीनगरचे डॉ. यासीर अली आणि एनआयटी कुरुक्षेत्रचे माजी डीन प्रा. एस. के. चक्रवर्ती यांनी संपूर्ण सैफ-डीएसटी केंद्राची पाहणी केली.

Times of India

# No withdrawals from main groups, fight on for SUK's senate seats

Times News Network

File photo



Shivaji University, Kolhapur, has jurisdiction over the colleges in Kolhapur, Sangli and Satara districts

**Kolhapur:** The Vikas Aghadi, led by the operators of educational institutes, and the Shivaji University Teachers' Association will contest the nine seats of registered graduates' collegium and eight seats of the teachers' collegium to the senate, the apex decision-making body of the varsity.

Shivaji University, Kolhapur (SUK), has jurisdiction over the colleges in Kolhapur, Sangli and Satara districts. The senate has 39 members. The Governor, who is also the Chancellor of the university, presides over the senate meetings. Usually, the vice-chancellor presides in the absence of the Governor.

The senate has representations of teachers, graduates, professors, operators of educational institutes and domain experts to be elected to various study boards. Most of the members of the study boards have been elected unopposed and the contest now is for the 17 seats of the graduates' and teachers' collegiums.

Both groups have fielded candidates for the collegiums. The voting will take place on November 14 and counting of votes will be on November 16. As many as 2,900 teachers have been registered as voters, while 36,000 graduates will cast their votes to elect their representatives to the senate.

On Wednesday, Sanjay D Patil of D Y Patil Group started the campaign for Vikas Aghadi. Sanjay D Patil is brother of Congress leader Satej Patil. The Vikas Aghadi also had Bharatiya Janata Party supported Vikas Manch. Some candidates of BJP supported forum too has got the nomination from Vikas Aghadi.

Sanjay D Patil said that BJP leader and minister Chandrakant Patil insisted to contesting jointly as they have been doing so for the last 15 years. "We don't want politics to come in the way of the development of the university. We are having ambitious projects in our mind for the students. A sports complex of Rs 45 crore will be built," said Sanjay D Patil, addressing the candidates of Vikas Aghadi.

Meanwhile, Sanjay D Patil's son Pruthviraj Patil has been elected unopposed to the senate from the collegium of the educational institute operators. His elder son Ruturaj Patil is a Congress MLA.

तरुण भारत

# विद्यापीठ निवडणूक उमेदवारांच्या अपिलावरील सुनावणी पूर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

- आज सुनावणीचा निकाल
- उमेदवारांची अंतिम यादी आज जाहीर होणार

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीच्या छाननीनंतर कुलगुरूंकडे आलेल्या अपिलावर बुधवारी रात्री उशिरापर्यंत सुनावणी सुरू होती. सुनावणी पूर्ण झाली तरी अपील केलेल्या उमेदवारांच्या तक्रारी ऐकूण घेतल्या. ३ रोजी ईमेलव्दारे पत्र पाठवून अपिलावरचा निकाल तक्रारदारांना कळवला जाईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. तसेच आज सायंकाळी ५ वाजता पात्र उमेदवारांची अंतिम यादीही जाहीर होणार आहे.



शिवाजी विद्यापीठ निवडणुकीतील अर्जांच्या छाननीनंतर केलेल्या अपिलावर कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव यांच्यासमोर दिवसभर सुनावणी सुरू होती. सुनावणीनंतर निकाल जाहीर केला जाईल, अशी आशा अपील करणाऱ्या उमेदवारांना होती. परंतू हा निकाल राखून ठेवला असून, तो आज जाहीर केला जाणार आहे.

## सुटा व शिव-शाहू आघाडीच्या प्रचाराला प्रारंभ

सुटा आणि शिव-शाहू आघाडीच्या प्रचाराला बुधवारी प्रारंभ झाला. सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संपर्क साधत आपल्या संघटनेचा अजेंडा सांगत, उमेदवारांची ओळख करून देत मतदान करण्याची विनंती केली, असे सुटाचे कार्यवाह डॉ. डी. एन. पाटील यांनी सांगितले.

लोकमत

# 'महावीर अध्यासना'ला एक लाखाची देणगी



कोल्हापूर : कुपवाड (जि. सांगली) येथील सेवानिवृत्त शिक्षिका सरितादेवी गतारे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी एक लाख रुपयांची देणगी दिली. त्यांनी अध्यासनाच्या इमारत देणगी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील यांच्याकडे देणगी सुपुर्द केली. कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी त्यांचे आभार मानले. अध्यासनाच्या इमारत बांधकामास दानशूर, अहिंसाप्रेमी व्यक्ती, संस्थांनी मदत करावी, असे आवाहन अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांनी केले.

पुण्यनगरी

# महावीर अध्यासनास सरितादेवी गतारे यांची देणगी

**कोल्हापूर :** श्रीमती सरितादेवी गतारे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी १ लाख रुपयांची देणगी भगवान महावीर अध्यासनाचे इमारत देणगी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. त्यांनी यापूर्वी १० हजार रुपयांची देणगी अध्यासनास दिलेली होती. या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील तसेच प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी सरितादेवी गतारे यांचे अभिनंदन केले. भगवान महावीर अध्यासनाच्या भव्य इमारत बांधकामास दानशूर, अहिंसाप्रेमी व्यक्ती व संस्थांनी मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे. ही देणगी आयकर सवलतीस १०० टक्के पात्र आहे.

पुण्यनगरी

# विभागीय बास्केटबॉल स्पर्धेला प्रारंभ

**राधानगरी :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि राधानगरी महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित कोल्हापूर विभागीय बास्केटबॉल स्पर्धेला बुधवारी प्रारंभ झाला. शहाजी लॉ कॉलेजच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धमध्ये दहा संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेचे उद्‌घाटन राधानगरीचे युवक नेते सुशील पाटील-कौलवकर यांच्या हस्ते झाले. क्रीडा संचालक शिवाजी विद्यापीठचे प्रा. डॉ. शरद बनसोडे, नाईट कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश फराकटे, राष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. जमीर सय्यद, प्राचार्य डॉ. डी. एस. मोरूस्कर, आयोजक प्रा. डॉ. नीलेश पाटील, बिद्री महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्रा. विश्वास पाटील, प्रा. ढेरे, प्रा. एक्कल, तसेच बास्केटबॉलप्रेमी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत



राधानगरी महाविद्यालयात बास्केट बॉल स्पर्धेचे उद्घतन करताना सुशील पाटील कौलवकर आदीसह मान्यवर

# राधानगरी महाविद्यालयाच्या वतीने विभागीय बास्केटबॉल स्पर्धा सुरू

**कौलव :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि राधानगरी महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित कोल्हापूर विभागीय बास्केटबॉल स्पर्धा सुरू झाल्या. शहाजी लॉ कॉलेजच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धमध्ये दहा संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेचे उद्घाटन राधानगरीचे युवक नेते सुशिल पाटील कौलवकर यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना सुशील पाटील बोलताना म्हणाले " शालेय अभ्यासक्रमाबरोबर शरीर मजबूत होण्यासाठी क्रीडास्पर्धा गरजचे आहे.यासाठी पालकांनी गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची कास धरावी संचालक शिवाजी विद्यापीठचे प्रा. डॉ. शरद बनसोडे, नाईट कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश फरकटे, राष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. जमीर सय्यद, प्राचार्य डॉ. डी एस मोरूस्कर, आयोजक प्रा. डॉ. निलेश पाटील, बिद्री महाविद्यालय चे प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्रा. विश्वास पाटील, प्रा. ढेरे, प्रा. एक्कल, तसेच बास्केटबॉल प्रेमी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# नियतकालिक स्पर्धेत कमला कॉलेजचे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संलग्न नियतकालिक स्पर्धेत कमला कॉलेजच्या 'कमला" या नियतकालिकाने यश मिळवले. बी. ए. भाग-२ च्या आरती कृष्णा पाटील प्रथम ज्योती बंके द्वितीय, बी. ए. भाग-३ च्या शिवानी सुभाष पाटील तृतीय क्रमांक प्राप्त केला. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी प्रमुख संपादक व प्रा. सुमती साळुंखे (इंग्रजी विभाग), प्रा. 'छाया माळी (हिंदी विभाग) यांनी संपादक म्हणून काम पाहिले. कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. क्रांतीकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्रा. तेजस्विनी मुडेकर यांनी मार्गदर्शन केले.